80


ISSN-2320-4494
RNI No.MAHAUL03008/13/2012-TC
UGC Approved

# POWER OF KNOWLEDGE

An International Multilingual Quarterly Refereed Research Journal

VOLUME - I ISSUE-XXI Jan-Mar.2018

TRIBUTE TO
STEPHEN HAWKING



ARTS | COMMERCE | SCIENCE
LIBRARY SCIENCE | AGRICULTURE
EDUCATION | MANAGEMENT
MEDICAL | ENGINEERING & I.T. | LAW
PHARMACY | PHYSICAL EDUCATION
SOCIAL SCIENCE | JOURNALISM

Power of Knowledge An International Multilingual Quarterly Refereed Research Journal
UGC Approved Sr.No.45681

Editor
Dr.Sadashiv H.Sarkate

E-mail : powerofknowledge3@gmail.com
www.powerofknowledge.co.in

सहाय्यक प्राध्यापक
महिला महाविद्यालय गेवराई

(2) Dr. Sanjay Talatkar
(ECO)

*Power of Knowledge UGC Approved Journal Volume : I Issue XX I Jan to Mar 2018 ISSN 2320- 44*

# अनुक्रमणिका (INDEX)


| अ. क्र. | प्रकरण | संशोधक | पृष्ठ क्रं. |
|---|---|---|---|
| १ | PLANS, POLICIES AND PROGRAMMES FOR EMPOWERMENT OF WOMEN | Dr.Mohamad Mustafa A. Mujawar Nadwi | १ |
| २ | EMPLOYEE SAFETY MEASURES FOR BETTER WORKING CONDITION | Wilson Kandre | १२ |
| ३ | A study of Changing face of Indian Banking Sector through Information and Communication Technology: A critical Review | Dr. Dilip Mohanrao Misal | १५ |
| ४ | Electronic Resources Management | Miss. Yadav Shyamla Chandrakant<br>Dr. Ghumre Shivshankar K | २१ |
| ५ | A STUDY OF WORKING AND GENERATION OF SELF-EMPLOYMENT BY SELF HELP GROUPS IN AURANGABAD DISTRICT | Dr. Anjali Jairam Bhusare | २५ |
| ६ | Potarajacha Por: A Reading | Dr. Ramesh A. Landage | २८ |
| ७ | Women Empowerment through Self-help Groups in Nashik City | Dr. Nitin Bhatu Songirkar | ३२ |
| ८ | The Greenhouse Effect and Its Impacts on Environment | Dr. Mirza Wajid Rustum Baig | ३७ |
| ९ | STATUS OF WOMEN IN INDIA | Dr. Vanita Sable-Chavan | ४२ |
| १० | Redescription of the soil nematode genus Axonchium Cobb, १९२० (Nematoda: Dorylamida) | Kumbhar K.A.<br>Kale M.K | ४४ |
| ११ | Women Empowerment: Issues and Challenges | Manohar S.S.<br>Dr. Sunita Watore. | ४८ |
| १२ | Social Trends and Directions in Physical Education Sport and the Society | Dr. Tanpure V.S. | ५३ |
| १३ | Citation Analysis of Doctoral theses awarded byShivaji University, Kolhapur during १९७२-२०१२ in the subject of Environment Science | Mrs. Shobha G. Dolas<br>Dr.Shalini M. Sakharkar | ५६ |
| १४ | TO STUDY THE PREVALANCE OF FREE LIVING PROTOZOAN FROM NAGINA GHAT, NANDED (MAHARASHTRA) | Jadhav P.B<br>Kale M.K | ६० |
| १५ | A Great Social Reformer - Maharshi Dhondo Keshav Karve | Dr. Vanita Sable-Chavan | ६३ |

Power of Knowledge UGC Approved Journal Volume : I Issue XX I Jan to Mar 2018 ISSN 2320- 4494


| | | | |
|---|---|---|---|
| १६ | निवडक मराठी चित्रपटाचे स्वरुप | प्रा.ढास रवींद्र बाबासाहेब | ६५ |
| १७ | दलित अल्पसंख्यांकाच्या आत्मकथनांचे स्वरुप | प्रा. डॉ.युवराज धबडगे | ६८ |
| १८ | बदलत्या काळानुसार मराठी भाषेतील स्थित्यंतरे | प्रा.डॉ.पंढरी डोईफोडे | ७१ |
| १९ | दलित साहित्य : सामाजिक प्रश्नांचा वेध | अविनाश सुदाम भालेराव | ७४ |
| २० | नव्वदोत्तर मराठी ग्रामीण कादंबरीवरील जागतिकीकरणाचा परिणाम | प्रा. गोपाल ढोले | ७७ |
| २१ | मराठी दलित नाट्य चळवळ | अविनाश सुदाम भालेराव | ८१ |
| २२ | मराठवाड्यातील दुष्काळ आणि समकालीन ग्रामीण कथा | प्रा.डॉ.सोपान माणिकराव सुरवसे<br>गोविंद दासा गरड | ८३ |
| २३ | संत तुकारामांच्या अभंगातील लोकतत्त्व | डॉ.बी.आर. दहिफळे | ८६ |
| २४ | सामाजिक प्रतिष्ठा व लग्न सोहळ्यातील अवाढव्य खर्च | डॉ. विठ्ठल शंकरराव देशमुख | ८९ |
| २५ | स्त्रीवादी कविता | प्रा. डॉ. संगीता ग. घुगे<br>सौ. सविता सिदगौडा (बिरगे) | ९१ |
| २६ | आदिवासी साहित्याची वाटचाल | प्रा.डॉ.हनुमंत भवारी | ९५ |
| २७ | प्रयोजनमूलक हिंदी और अनुवाद का महत्व | प्रा. डॉ. ज्ञानेश्वर भीमराव महाजन | १०१ |
| २८ | मध्यकालीन भक्तिसाहित्य और सामाजिक एकात्मता में प्रासंगिकता | प्रा. पाटील एस.डी. | १०३ |
| २९ | हिंदी उपन्यासों में चित्रित नारी का मनोवैज्ञानिक विश्लेषण | प्रा.डॉ.उत्तम जाधव | १०७ |
| ३० | २१ वीं सदी के प्रथम दशक की हिंदी स्त्री कविता | डॉ. सन्मुख नागनाथ मुच्छटे | ११० |
| ३१ | वैश्विक परिप्रेक्ष्य में हिंदी का स्थान | प्रा. डॉ. डी. बी. महाजन | ११३ |
| ३२ | भूमंडलीकरण के परिवेश में स्त्री एवं दहेज प्रथा | डॉ. ज्ञानेश्वर अंकुशराव देशमुख | ११६ |
| ३३ | शहरीकरणासाठी आर्थिक व पायाभूत सुविधा व वाहतुक व्यवस्था | प्रा. डॉ. प्रमोद कृष्णराव ढोकणे | ११८ |
| ३४ | नवजात बालकाची परंपरागत काळजी घेणे या संदर्भात नांदेड जिल्ह्यातील विविध समुदायांचा समाजशास्त्रीय अभ्यास | डॉ. यशवंत एस. चव्हाण<br>प्रा. भिमराव डी. पुंडगे<br>डॉ. सौ. एस.वाय.चव्हाण<br>डॉ. सुयश वाय. चव्हाण | १२३ |
| ३५ | क्रांतीकारक कान्हया भिल्ल | प्रा.मोहन जगन्नाथ काळकुटे | १२७ |
| ३६ | डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे सामाजिक सुधारणेतील योगदान | प्रा.डॉ.शिवाजी लक्ष्मण नागरगोजे | १३० |
| ३७ | छ. शाहू महाराजांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकराना केलेले सहकार्य | प्रा. डॉ .विद्यासागर पुडंलीक सोनकांबळे | १३२ |
| ३८ | आपत्ती व्यवस्थापनात प्रशासनाची भूमिका | प्रा.डॉ.बोबडे बी.बी. | १३६ |
| ३९ | शहरीकरण आणि घनकचरा व्यवस्थापन | प्रा.डॉ.राम ताटे<br>प्रा.अर्चना वाघमारे | १४२ |


सहाय्यक प्राध्यापक
महिला महाविद्यालय गेवराई

83




| | | | |
|---|---|---|---|
| ४० | श्रीलंकेतील वांशीक संघर्ष | प्रा.अरुण महादेव राख | १४५ |
| ४१ | राजर्षी छ. शाहू महाराज सामाजिक लोकशाहीच्या चळवळीचे एक आधारस्तंभ | डॉ. सुनिल शिवमूर्ती रजपूत | १४९ |
| ४२ | आपत्ती व्यवस्थापन : प्रशासनाची भूमिका | प्रा.सुशीलकुमार श्रीराम शिंदे | १५१ |
| ४३ | मौखिक व प्रांथिक 'ओवीचा' परस्परसंबंध | सहा.प्रा.अंकुश काळे<br>डॉ.भाऊसाहेब राठोड | १५७ |
| ४४ | महाराष्ट्र राज्याच्या भांडवली जमेतील अलिकडील काळातील प्रवृत्तींचा मागोवा | प्रा.डॉ.संजय तळतकर | १६० |
| ४५ | Study of Variable Stars using Small Optical Telescopes | A.N. Ardad , R.S. Yannawar<br>P.M. Kokne | १६४ |
| ४६ | STUDIES ON GREGARINE LEIDYANA AMPULLA SP. N. (APICOMPLEXA: EUGREGARINORIDA: LEIDYANIDAE) IN GRASSHOPPER CATANTOPES SP (INSECTA: ORTHOPTERA) | Kale M.K<br>Jadhav P.B | १६७ |
| ४७ | Globalisation and Islamic Terrorism : the process of mutual response in the world politics | Prof.Joshi Archana Digambarrao | १६९ |
| ४८ | Teaching Astronomy in Higher Education | A.N. Ardad , P.M. Kokne<br>R.S. Yannawar | १७५ |
| ४९ | Important Concepts of E-Commerce | Prof.Khadke Sudhir Abasaheb | १७७ |
| ५० | Studies on Zooplankton diversity from Kankaleshwar Lake, Beed, (MS) India | Nakhate A.B.<br>Kale M.K. | १८० |
| ५१ | Customer Relationship Marketing (CRM): Need of Changing situation | Prof.Naikwade Akshay Vitthalrao | १८२ |
| ५२ | Economic Trends in Indian Milk Production | Dr.Atul H. Salunke<br>K G. Tamhane | १८७ |
| ५३ | Decentralization and Local Government | Dr. Birangane S.S. | १९० |
| ५४ | Role of Media in the context of Human Rights | Prof.Ashok Namdev Kavthekar | १९३ |
| ५५ | संत तुकारामांच्या साहित्यातून प्रकट होणाऱ्या सामाजिक समस्या | डॉ. संतोष क. चव्हाण<br>संतोष शिवनाथ कानडे | १९६ |
| ५६ | साहित्य आणि राज्यशास्त्र सहसंबंध | प्रा.मधुकर निवृत्तीराव बैकरे | २०० |
| ५७ | वस्तीगृहात राहणाऱ्या व वस्तीगृहात न राहणाऱ्या मुलींचा व्यक्तीमत्त्व व समायोजन पातळीचा एक तुलनात्मक अभ्यास | खाडे वंदना भिमराव<br>डॉ. वाटोरे एस. एम. | २०४ |
| ५८ | आवकाश प्राप्त जीवन की कथा वापसी कहानी | प्रा.डॉ.पवन नागनाथराव एमेकर | २१० |
| ५९ | मानवी वृत्ती - प्रवृत्तीचा वेध घेणारी कादंबरी - खडक वासला | प्रा.डॉ.प्रेमला मुखेडकर | २१३ |
| | | | |


सहाय्यक प्राध्यापक
महिला महाविद्यालय गेवराई

84

*Power of Knowledge UGC Approved Journal Volume : I Issue XX I Jan to Mar 2018 ISSN 2320- 4494*

# महाराष्ट्र राज्याच्या भांडवली जमेतील अलिकडील काळातील प्रवृत्तींचा मागोवा

**प्रा.डॉ.संजय तळतकर**

महिला कॉलेज गेवराई

अंदाजपत्रकास इंग्रजीमध्ये (Budget) 'बजेट' असे म्हटले जाते. १७७३ या वर्षी बजेट हा शब्द वापरण्यात आला. अंदाजपत्र हा शब्द अर्थसंकल्प किंवा बजेट या नावाने ओळखला जातो. अंदाजपत्रक तयार करुन त्याला कायदेमंडळाची मान्यता घेणे ही बाब राष्ट्राच्या वित्तीय प्रशासनाचा आत्मा मानला जातो. शासन पुढील वर्षाचा खर्च भागविण्यासाठी कशाप्रकारे संसाधन गोळा करणार व शासनाने गोळा केलेली संसाधने कोणत्या प्रकारे खर्च करणार व कोणत्या घटकांवर खर्च करणार या बाबतची स्पष्ट माहिती देशातील जनतेला द्यावी लागते.

भारतात कायदेमंडळात बजेट सादर करण्याची ही प्रक्रिया सन १८६० पासून सुरु झाली. सन १८५८ मध्ये इंग्लंडच्या राणीचे कंपनीची सत्ता काढून घेतल्यानंतर भारतात ब्रिटीश पार्लमेंट ला जबाबदार राज्यप्रणाली सुरु झाली त्या वेळेसचे वित्त सचिव जेम्स विल्सन यांनी भारत सरकारचा पहिला अर्थ संकल्प सादर केला. तेव्हा पासून सुरु झालेली अंदाजपत्रक सादर करण्याची प्रक्रिया आजतागायत चालू आहे. जे एल.हॅन्सन सरकारच्या खर्चाचा आणि महसूलाचा पूढील वर्षाचा अंदाज म्हणजे अंदाजपत्रक होय, अशा शब्दात अंदाजपत्रकाची व्याख्या केलेली आहे. सरकारच्या अंदाजपत्रकात तीन स्वरुपाची आकडेवारी असते. १) मागील वर्षाच्या प्रत्यक्ष महसूलाची (उत्पन्नाची ) आणि स्वखर्चाची आकडेवारी २) चालु वर्षातील सुधारीत अंदाजपत्रक ३) पुढील वर्षाच्या महसूलाच्या आणि खर्चाचा अंदाज.

भारतीय राज्यघटनेतील तरतुदीनुसार दरवर्षी केंद्रसरकार आणि राज्यसरकारांना अंदाजपत्रक सादर करणे आवश्यक असते. केंद्रसरकारचे अर्थमंत्री संसदेमध्ये दरवर्षी अंदापत्रक सादर करीत असतात. राज्यसरकारचे अर्थमंत्री, राज्याच्या विधिमंडळामध्ये राज्याचे अंदाजपत्रक सादर करीत असतात. सारकारच्या समोर अनेक आर्थिक व सामाजिक उद्दिष्टे असतात. अशाप्रकारची आर्थिक आणि सामाजिक उद्दिष्टे गाठण्याचे साधन म्हणून अंदाजपत्रतीय धोरणास अत्यंत महत्व असते. भारतसारख्या विकसनशील देशात अंदाजपत्रकाची महत्वाची उद्दिष्टे आर्थिक विषमता कमी करणे, अर्थव्यवस्थेला स्थिरता प्राप्त करुन देणे, मागीतलेल्या प्रदेशांच्या विकासास गती देणे, आर्थिक वृध्दी घडवून आणलेल्य पूर्ण रोजगारांची स्थिती प्रस्थापित करणे अशा प्रकारच्या उद्दिष्टांची पूर्तता करण्यासाठी वित्तीय साधने ही एक महत्वाची बाजु असते. कारण वित्तीय साधनाच्या उपलब्धतेवरच अंदाजपत्रकातील लक्ष्ये पार पाडणे शक्य असते. वित्तिय साधनाअभवी आर्थिक विकासाचे प्रक्रिया गतिमान करणे शक्य नसते.

अंदाजपत्रकाचे महसूली अंदाजपत्रक आणि भांडवली अंदाजपत्रक अशा दोन प्रकारे वर्गीकरण करता येते. ज्या अंदाजपत्रकात महसूली किंवा खात्यावरील जमा आणि खर्चाचा समावेश होतो त्यास महसूली अंदाजपत्रक असे म्हटले जाते. त्याच प्रमाणे अंदाजपत्रकात भांडवली खात्यावरील जमा आणि खर्चाचा समावेश होत असतो त्यास भांडवली अंदाजपत्रक असे म्हटले जाते. भांडवली अंदाजपत्रकात भांडवली जमा आणि भांडवली खर्चाचा समावेश होत असतो. भांडवली खर्च म्हणजे (Assets) निर्माण करण्यासाठी होणारा खर्च आणि कर्ज दिल्याने होणारा खर्च असतो. भांडवली खर्चामध्ये प्रामुख्याने केंद्रसरकारने भांडवली बाबीवर केलेला खर्च महत्वाचा असतो. अशा प्रकराच्या खर्चामध्ये केंद्र सरकारने राज्यसरकारे, केंद्रशासीत प्रदेश यांना कर्जाच्या स्वरुपात दिलेली कर्जे ही एक त्रास असते. अशा प्रकारच्या कर्जातुन राज्य सरकारे आणि केंद्रशासीत प्रदेशांना आर्थिक सेवा सामाजिक सेवा आणि सामुहिक विकास साध्य करण्यासाठी मदत होते. त्याच प्रमाणे सरकारच्या संरक्षणावर होणारा खर्च हा देखील भांडवली खर्चाचा एक घटक असतो. विविध राज्यामधील आणि केंद्रशासित



प्राचार्य / प्राध्यापक
महिला महाविद्यालय गेवराई

प्रदेशातील अनेक प्रकल्पांना लागणारा वित्त पुरवठा हा भांडवल खर्चाच्या माध्यमातुन होत असतो. भांडवली खर्चात आर्थिक विकासाची कामे, सामुदायिक सेवा इ. वर होणाऱ्या खर्चाचा ढोबळमनाने समावेश होतो.

केंद्र सरकार आणि राज्य सरकारांना दरवर्षी अंदाजपत्रक सादर करणे बंधनकारक असते. अंदाज पत्रक किंवा अर्थसंकल्प म्हणजे कायदेमंडळात विचारार्थ ठेवावयाच्या वित्तीय स्वरुपाच्या सुचना होत. अंदाजपत्रकात सरकारच्या महसूल (उत्पन्न) आणि खर्चाच्या अंदाजाची आकडेवारी दिलेली असते. भारतीय राज्यघटनेच्या कलम ११२ नुसार दरवर्षी केंद्रसरकारच्या अर्थमंत्र्याला संसदेमध्ये अंदाजपत्रक सादर करणे बंधनकार असते. त्याचप्रमाणे भारतीय राज्यघटनेच्या कलम २०२ नुसार राज्यसरकारच्या अर्थमंत्र्याला राज्य विधिमंडळाच्या सभागृहात अंदाजपत्रक सादर करणे अनिवार्य असते.

अंदाजपत्रकाची विभागणी १) महसूली अंदाजपत्रक आणि २) भांडवली अंदाजपत्र अशा दोन प्रकारात करण्यात येते. महसुली अंदाजपत्रकात चालू किंवा महसूली खात्यावरील जमा आणि खर्च या बाबींचा समावेश होतो. भांडवली अंदाजपत्रकात भांडवली खात्यावरील जमा आणि खर्च बाबींचा समावेश होतो.

भांडवली जमा म्हणजे ज्यामध्ये केंद्र सरकारने राज्य सरकारे, केंद्रशासीत प्रदेश आणि सर्वाजनिक उपक्रमांना दिलेली कर्जे आणि आगावू रकमा यांची निव्वळ वसुली यांचा समावेश होतो. त्याचप्रमाणे इतर भांडवली जमा ज्यामध्ये जतनेच्या अल्प बचती, प्रॉव्हिडंड फंड, विशेष जमा रकमा पोस्टातील अल्पबचती निव्वळ कर्जउभारणी या बाबींचाही समावेश होतो. राज्य सरकारच्या भांडवली जमे मध्ये ज्या प्रमाणात वाढ होत असते त्याचा भांडवली खर्चाशी संबंध असतो. महाराष्ट्राच्या भांडवली जमेमध्ये प्रामुख्याने १) सरकारी ऋण लेख्यांकडून जमा (राज्यरकारचे देशांतर्गत ऋण आणि केंद्रसरकारकडून कर्जे व अगाऊ रकमा) २) राज्य सरकारकडून कर्जे व आगाऊ रकमा यांची वसुली ३) इतर निव्वळ भांडवली जमा आणि निव्वळ (लोकलेखा) ज्यामध्ये अ) अल्पबचत, भविष्य निर्वाह निधी इत्यादी (निव्वळ) ब) निव्वळ राखीव निधी (व्याजी आणि बिनव्याजी) क) निव्वळ नागरी ठेवी (व्याजी आणि बिनव्याजी) आणि ड) इतर या सर्वांचा समावेश होतो. तक्ता क्रमांक १ मध्ये महाराष्ट्र राज्याच्या एकूण भांडवली जमेतील २०१०-११ ते २०१६-१७ या वर्षातील प्रवृत्तींचा मागोवा घेण्यात आला आहे. या तक्त्यामध्ये महाराष्ट्र राज्याच्या एकूण भांडवली जमेतील सर्वच घटकांचा मागोवा घेण्यात आला आहे. कोणत्याही राज्य सरकारच्या दृष्टीने देशांतर्गत ऋण वाढत जाणे ही एक चितेची बाब असते. त्याचप्रमाणे केंद्रसरकारकडून मिळालेले कर्ज व आगावु रकमा यांचेही प्रमाण वाढत जाणे राज्याच्या हिताचे नसते. अलीकडील काळात महाराष्ट्रासारख्या प्रगत राज्याचे अंतर्गत कर्ज वेगाने वाढत आहे. राज्यावरील कर्जाच्या वाढत्या बोजामुळे आर्थिक सेवा, सामुदायिक सेवा इत्यादीवर करण्यात येणाऱ्या खर्चास मर्यादा पडतात. शेती, ग्रामीण विकास, उर्जा, पूर नियंत्रण इत्यादी सारख्या महत्वाच्या बाबीवर खर्च करण्यावर अनेक बंधते राज्य सरकारला येवु शकतात.

**तक्ता क्रमांक १ :-** राज्य सरकारची एकूण भांडवली जमा (आकडेवारी कोटी रु.)

| नाव | २०१०-११ | २०११-१२ | २०१२-१३ | २०१३-१४ | २०१४-१५ | २०१५-१६ | २०१६-१७ |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. सरकारी ऋण लेख्यांकडून जमा (अ आणि ब) | २०७४० | २४४५३ | २२११७ | २७८८७ | ३५७२६ | ३७५६४ | ४७०६४ |
| अ) राज्य शासनाने देशांतर्गत ऋण | १९९२० | २४१४६ | २१३६६ | २६९२३ | ३५१८४ | ३६४६५ | ४५९६५ |
| ब) केंद्रसरकारकडुन कर्ज व आगावू रक्कमा | ८२० | ३०६ | ७५१ | ९६४ | ५४२ | १०९९ | १०९९ |



सहायक प्राध्यापक
महिला महाविद्यालय गेवराई

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| २) राज्य सरकारकडून कर्जे व आगावु रकमा यांची वसुली | ६४० | ५५९ | ८६३ | ७२८ | ९७५ | १०५७ | ११५१ |
| ३) इतर निव्वळ भांडवली जमा | ९ | ४६७ | -९० | ८५० | १० | ० | ० |
| ४) लोकलेखा (निव्वळ) | २३५० | २८५८ | -११२८ | ९४६३ | ९२२८ | १०११२ | १७५५ |
| अ) अल्पबचत भविष्य निर्वाहनिधी | २०२२ | २२६० | २१८८ | १८९४ | १२६० | १५४० | १७७१ |
| ब) राखीव निधी निव्वळ (१+२) | -१२६ | -४०० | ३८ | -३८१ | -२७५ | -१०१५ | ४३९ |
| १) व्याजी | १०६ | ११४ | -१४१ | -८० | -४३ | -२९०६ | -१९४१ |
| २) बिनव्याजी | -२३२ | -५१३ | १८०९ | -३०१ | -२३२ | १८९१ | २३८० |
| क) नागरी ठेवी निव्वळ (१+२) | ६२५९ | ४५३२ | ६४४२ | ६७७२ | ४४११ | २३४३ | ५१९० |
| १) व्याजी | ३९४६ | ३७३७ | ४२६४ | ४५९० | ३३६१ | २११ | २८८० |
| २) बिनव्याजी | २३१३ | ७९४ | २१७८ | २१८२ | १०५० | २१३३ | २३१० |
| ड) इतर | -५८०५ | -३५३४ | -९७९५ | ११७८ | ३८३२ | ७३२४ | -५६४५ |
| **एकूण भांडवली जमा** | **२३७३९** | **२८३३६** | **२१८४२** | **३८९२८** | **४५९३९** | **४८८१३** | **४९९७०** |

आधार :- महाराष्ट्र आर्थिक पाहणी, २०१६-१७, अर्थ व सांख्यिकी संचालनालय, नियोजन विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई पृष्ठ क्रमांक ८०३.

तक्ता क्रमांक १ वरुन असे निदर्शनास येते की, २०१०-११ यावर्षी राज्य सरकारचे एकुण सरकारी ऋण (लेख्यांकडून जमा) २०७४० कोटी रु. होते. २०१६-१७ यावर्षी राज्यसरकारचे ऋण (सरकारी ऋण-लेख्यांकडून जमा( ४७०६४ कोटी रुपयांपर्यंत वाढले. याचा अर्थ असा की, २०१०-११ ते २०१६-१७ या सात वर्षात राज्य सरकारच्या ऋणात जवळपास २.२६ पटीने वाढ झाली. २०१०-११ यावर्षी राज्य सरकारचे देशांतर्गत ऋण १९९२० कोटी रु. होते. २०१६-१७ यावर्षी राज्य सरकारचे देशांतर्गत ४५९६५ कोटी रुपयां पर्यंत वाढले. २०१०-११ ते २०१६-१७ या सात वर्षात राज्य सरकारच्या देशांतर्गत ऋणामध्ये २-३ पट वाढ झाल्याचे दिसून येते. प्रत्येक राज्य सरकारच खर्चात सातत्याने वाढ होत आहे. महसुली खर्च आणि भांडवली खर्च अशा दोन्ही प्रकारच्या खर्चात सातत्याने वाढ होत आहे. राज्य सारकारला महसूल आणि खर्चाची तोंड मिळवणी करण्यासाठी केंद्र सरकार कडून कर्ज व आगावू रकमा यांची आवश्यकता भासत असते. केंद्रसरकारडुन राज्य सरकारांना मिळणारी कर्जे व आगावु रकमा या भांडवली जमा यातील महत्वाचे घटक असतात. २०१०-११ या वर्षी महाराष्ट्र सरकारने केंद्रसरकार कडून कर्जे व आगावू रकमा या रुपाने ८२० कोटी रु. एवढी रक्कम घेतली होती. २०१६-१७ या वर्षी केंद सरकारकडून महाराष्ट्र सरकारला कर्ज व आगावू रकमा म्हणून एकूण १०९९ कोटी रुची रक्कम प्राप्त झाली होती.

...-११ ते २०१६-१७ या सात वर्षाच्या कालावधीत केंद्रसरकारकडून प्राप्त झालेल्या कर्जे व आगावू रकमा यामध्ये ... पट इतकी वाढ झाल्याचे आढळून येते.

राज्य सरकारकडुन कर्जे आणि आगवु रक्कमा यांची वसुली दर भांडवली जमेचा एक महत्वाचा भाग असतो. राज्य सरकारकडून अधिक प्रमाणात कर्जे आणि आगावु रकमा यांची वसुली वेगाने करण्यात आली तर त्यामुळे राज्य सरकारच्या भांडवली जमेमध्ये वेगाने वाढ होवु शकते. २०१०-११ या वर्षी राज्य सरकारकडुन कर्जे व आगावु रकमा यांची वसुली ६४० कोटी रु. होती. २०१६-१७ या वर्षी ही वसुली ११५१ कोटी रु. इतकी झाली. सात वर्षाच्या कालावधीत या रकमेत १.७ पट इतकी वाढ झाली असे म्हणता येते.

राज्य सरकारची एकूण भांडवली जमा २०१०-११ यावर्षी २३७३९ कोटी रुपये इतकी होती. एकुण भांडवली जमेमध्ये सर्वात मोठा हिस्सा सरकारी ऋणाच्या असल्याचे दिसून येतो. अशाप्रकारे ऋण (कर्जउभारणी) राज्य सरकारला करावी लागते. सरकारी ऋणामध्ये सरकारच्या सर्व प्रकारच्या अंतर्गत आणि बाहय कर्जाचा समावेश होतो. त्याचप्रमाणे सरकारने जनतेकडुन किंवा व्यापारी बँकाकडुन घेतलेल्या कर्जाचा देखील समावेश होतो. २०१०-११ मध्ये एकूण २३७३९ कोटी रुपयांच्या एकूण भांडवली जमे मध्ये सरकारी ऋणाची रक्कम २०७४० कोटी रुपये इतकी होती. भांडवली जमेच्या इतर घटकांच्या (इतर प्रकारचे मार्ग) तुलनेत सरकारी ऋणाची (कर्जाच्या) रक्कम जवळपास ८७.३६ टक्के असल्याचे दिसून येते. २०११-१२ यावर्षी राज्य सरकारची एकूण भांडवली जमा २८३३६ कोटी रु. इतकी होती त्यापैकी राज्य सरकारचे (कर्ज) २४४५३ कोटी रु. इतके होते म्हणजे एकूण भांडवली जमेमध्ये सरकारी ऋणाची (कर्जांची) टक्केवारी ८६.२९ टक्के होती. त्याचप्रमाणे २०१५-१६ यावर्षी राज्य सरकारची एकूण भांडवली जमा ४८८१३ कोटी रु. ४८८१३ कोटी रु. होती. त्यापैकी सरकारी ऋणाची रक्कम ३७५६४ कोटी रु. होती . एकूण भांडवली जमेमध्ये सरकारी ऋणाची (कर्जाची) टक्केवारी ७६.९५ इतकी होती. २०१६-१७ यावर्षी राज्य सरकारची एकूण भांडवली जमा ४९९७० कोटी रुपये होती. त्यामध्ये सरकारी ऋणाची (कर्जाची) रक्कम ४७०६४ कोटी रुपये होती. एकूण भांडवली जमेशी हे प्रमाण ९४.१८ टक्के इतके होते. सुरुवातीच्या दोन वर्षात म्हणजे २०१०-११ आणि २०११-१२ या वर्षात हे प्रमाण अनुक्रमे ८७.६३ टक्के आणि ८६.२९ टक्के होते. शेवटच्या वर्शी (२०१६-१७) मध्ये सरकारच्या एकूण भांडवली जमेतील राज्य सरकारच्या ऋणाचे (कर्जाचे) प्रमाण ९८.१८ टक्के होते.

महाराष्ट्रासारख्या प्रगत राज्यावर देखील ते कर्ज उभारणीमुळे अनेक आर्थिक समस्या उद्‌भवत आहेत. महाराष्ट्र राज्याच्या वाढत्या कर्जाच्या बोज्यामुळे अनेक विकास कामांसाठी लागणारा निधी अपुरा पडत आहे. शेतकऱ्याची कर्जमाफी, वाढता प्रशासकीय खर्च, कर्जावरील व्याजाचा बोजा इत्यादीमुळे महाराष्ट्र राज्याची पुरती आर्थिक कोंडी झाली आहे.

भांडवली जमेचा विचार करीत असताना राज्य सरकारकडे असणाऱ्या इतर जमा रकामा याही बाबीची नोंद घ्यावी लागते. राज्याच्या इतर बाबीमध्ये जनतेकडुन पोस्ट ऑफीसमध्ये जमा होणारी अल्पबचत, राष्ट्रीय बचत प्रमाणपत्र, प्रॉव्हिडंट फंड इत्यादी स्वरुपाच्या माध्यमातुन इतर जमा रकमा उपलब्ध होत असतात.

भांडवली जमेमध्ये वरील प्रकारच्या सर्व घटकाव्यतिरिक्त इतर भांडवली जमा या ही मार्गाने काही भर पडु शकते. राज्य सरकारच्या उपक्रमांच्या भाग विक्रीतुन ज्यास निर्गुंतवणक असे म्हणता येईल त्यातुन काही रक्कम भांडवल जमेचा एक भाग असते परंतु याही प्रकारच्या मार्गास काही मर्यादा असतात.

**संदर्भ :-**


१) महाराष्ट्राची आर्थिक पाहणी २०१६-१७, अर्थ व सांख्यिकी संचालनालय, नियोजन विभाग, महाराष्ट्र शासन मुंबई

२) इंडियन इकॉनॉमी - गौरव दत्त व ए.महाजन, एस चांद अ‍ॅण्ड कं.प्रा.लि.नवी दिल्ली

३) भारतीय अर्थव्यवस्था रंजन कोळंबे - भगीरथ प्रकाशन, पुणे




प्राचार्य ... महिला महाविद्यालय गेवराई